दैनिक
# जनपत्र
• औरंगाबाद • बुधवार, दि.16 सप्टेंबर 2015 • वर्ष 9 • अंक 64 • पाने 6 • किंमत ₹ 2



## बालकामगार व वस्तानवी शाळेत मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न



औरंगाबाद ( प्रतिनिधी ) : आझाद अली शाह शिक्षण संस्थेद्वारे कासीब वरी दर्गा पडेगाव येथे संचलित एमजीएम वस्तानवी ऊर्दू प्राथमिक आणि माध्यमिक शाळेतील २३२ विद्यार्थ्यांची तसेच मिस्बाह कॉलनी विट भट्टी आणि मिटमिटा येथे संचलित राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प शाळेतील ७८ विद्यार्थ्यांची दि. १२ सप्टेंबर रोजी एम.जी.एम. वस्तानवी ऊर्दू प्राथमिक शाळेच्या आवारात मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त शिक्षकांचीही तपासणी करण्यात आली.

या कार्यक्रमाचे उदघाटन संस्थेच्या अध्यक्षा खान सुरैय्या यांनी केले तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे प्रशासकीय अधिकारी खान साजिद पाशा, प्रशांत गिरे, निलेश वानखेडे, अंकुश वैरागड, अनिल चव्हाण, संदिप जगदाणे, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक शेख जकेरीया आणि प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका खान अजरा या उपस्थित होत्या.

आलेल्या पाहुण्यांचे व डॉक्टरांचे विद्यार्थ्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

त्यानंतर संस्थेचे प्रशासकीय अधिकारी साजिद पाशा यांनी आपल्या भाषणातून सर्व विद्यार्थी आरोग्य हे महत्त्वाचे प्रत्येकाने आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी आणि आजारपणापासून दुर ठेवावे हा मोलाचा सल्ला दिला, तर संस्थेच्या अध्यक्षा खान सुरैय्या यांनी आपल्या भाषणातून रोज व्यायाम करण्याचा आणि व्यसनापासून दुर मंत्र हा सुखी आणि समाधानी व्यक्तींचा मंत्र असल्याचे विशद केले. त्यानंतर लगेच वर्गनिहाय सर्व विद्यार्थ्यांची आरोग्य व रक्तगट तपासणी करण्यात आली व तपासणी नंतर सर्व विद्यार्थ्यांना खाऊ, चॉकलेट व बिस्कीटचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन रुबी हशम यांनी केले तर आभार प्रदर्शन फिरदोस फातेमा यांनी केले. तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दुर्रेशवार खान [illegible] खान, निखत अंजुम, परविन काजी, शेख हिना, मुमताज पठाण, अफरीन शेख, अंजु शर्मा, आयशा अक्तर खान, आदिंनी परिश्र[म] घेतले. सर्व विद्यार्थ्यांच्या जेवणानंत[र] कार्यक्रमाची सांगता करण्यात आल[ी].